# शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे चिकित्सक अध्ययन

**डॉ. सिध्दार्थ हरिदास मेश्राम,**
अर्थशास्त्र विभाग
सेठ केसरीमल पोरवाल महाविद्यालय,
कामठी, जि. नागपूर
मो. नं. ९९७०७७९०८५

**गोषवारा –**

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीचे स्थान अतिशय महत्वपुर्ण आहे. भारतातील ६८ ते २० % लोकसंख्या ही शेतीवर निर्भर आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था ही पुर्णत मान्सुनच्या पाऊसावर अवलंबुन आहे. गेल्या काही दशकात संपूर्ण भारतात पाऊस पडण्याचे प्रमाण दिवसेदिवस कमी कमी होत चालले आहे. त्यातही शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही समस्या निर्माण झाली आहे. ही समस्या प्रकर्षाने भारतातील काही निवडक राज्यामध्ये जास्त प्रमाणात दिसून येत आहे. त्यामध्ये महाराष्ट्र आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड ही राज्ये समाविष्ट आहेत. या पाचही राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महतेचे तुलनात्मक अध्ययन केले असता महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण हे सर्वात जास्त आहे. तसेच महाराष्ट्रात विदर्भामध्ये सर्वात जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे दिसुन येते.

गेल्या काही वर्षात कापुस उत्पादनामध्ये व त्यांच्या लागवडीमध्ये अनेक प्रकारचे बदल घडुन आले. त्या बदला सोबत शेतकऱ्यांना जुळवून घेता आले नाही. त्यांना उत्पन्न व रोजगार निर्माण करण्यात अनेक अडथळे निर्माण झाले त्यामुळे कृषीतील बिजसमस्या, विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना निर्माण झाली. शेवटी यावर एकच उपाय म्हणून कापूस उत्पादक शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त झाला तसेच कापुस हे पिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या करणारे पिक आहे असा समज विदर्भामध्ये निर्माण झाला. अपेक्षित उत्पन्न आणि वास्तविक उत्पन्न यामध्ये फार मोठी तफावत असल्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी कर्जाच्या दृष्टचक्रात अडकले गेले. त्यामुळे त्यांना एकप्रकारचा तणाव निर्माण होऊन आत्महत्या करण्यास प्रवृत्त झाले. शेतकरी नेहमी कर्जामध्ये जगतो व कर्जामध्येच मरतो अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा प्रकारची परिस्थिती संपुर्ण भारतातच दिसुन येते. परंतु अलिकडे इतर राज्यामध्ये आत्महत्येचे प्रमाण फार कमी झाले आहे याचे कारण १९९२ मध्ये कापसाची किंमत ही जास्त होती. त्यामुळे कापसाला विदर्भातील पांढरे सोने म्हटल्या जायचे. कापसाला सोन्यासारखी किंमत असायची परंतु आता सर्वात पहिली शेतकऱ्याची आत्महत्या ही महाराष्ट्रातील विदर्भामध्ये झाली ही दफ्तरी नोंद आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे पडित जमीन, सिंचनाच्या अपुऱ्यासोयी, कापसाच्या पिकांची असफलता, नविन तंत्रज्ञानाचा अभाव, ही होत कापुस हे विदर्भाचे महत्वाचे पिक आहे. तरी या कापुस उत्पादक शेतकऱ्यांना सरकार कोणताही प्रकारची मदत करीत नाही. त्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी तणावात राहून शेवटी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात.

विविध माहितीवर संकलनावरून पाणी व्यवस्थापन, नैसर्गिक शेती विशेष कृषी क्षेत्र, विविध पिक व्यवस्था, पुरक स्त्रोत, हवामान जोखीम व्यवस्थापन पध्दत, कर्जसुविधा, शास्त्रीय नवप्रवर्तन आणि आधुनिक कृषी पध्दती, शेतकऱ्यांना योग्य कृषी प्रशिक्षण, शेतकऱ्यांचा आत्मविश्वास आणि कार्यक्षमतेत वृध्दी करण्यासाठी समुपदेशन करणे, शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करणे, जेणेकरून ते आत्महत्या करणार नाहीत तसेच आत्महत्या केलेल्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना केंद्र आणि राज्य सरकारद्वारे १ लाख रूपयाचे पॅकेज दिल्या जाते. या पॅकेजची अंमल बजावणी नाबार्डद्वारे राबविल्या जाते. प्रस्तुत पेपरमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे आणि प्रभावी उपाय योजना सूचविल्या आहेत.

**बिजशब्द –** प्रस्तावना, भारतीय कृषी धोरण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कारणे, उपाययोजना.

**प्रस्तावना –**

भारत हा बहुसंख्य खेडयाचा देश आहे. आज भारतातील एकूण लोकसंख्यापैकी २/३ प्रतिशत लोकसंख्या ग्रामीण भागामध्ये राहते. विशेषत: ग्रामीण भागातील लोकाचा शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. याला महाराष्ट्र राज्य देखील अपवाद नाही. १९९१ पासून नविन आर्थिक धोरणाला प्रारंभ झालेला असला तरी स्थुल मानाने भारताच्या स्वांतन्त्र्योत्तर अर्ध्या शतकात

इतिहास हा नियोजनबध्द आर्थिक प्रयत्नाचा इतिहास आहे. या कालखंडात आर्थिक वृध्दि होत असतांनाच काही समस्याही निर्माण झाल्या.

भारतीय अर्थव्यवस्थेला भेडसावणाऱ्या दारिद्य, बेकारी अतिरिक्त लोकसंख्या वाढ, आर्थिक विषमता या दिर्घकालीन समस्यामध्ये शेतकरी आत्महत्या या रूपाने एका नविन समस्येची भर पडली आहे. वास्तविकता शेतकऱ्यांच दुखण हे आजचचं नाही. महात्मा फुलेंनी देखील या दुखण्याला आपल्या "शेतकऱ्यांचा आसुड" या पुस्तकातून वाचा फोडली होती. ग्रामीण भागाचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही. कृषी करणारा शेतकरी हा शेतीचा कणा आहे म्हणूनच लालबहादुर शास्त्री यांनी 'जय जवान' जय किसान' हा नारा दिला. स्वांतन्त्र्यानंत्तर महात्मा गांधिजीचे स्वप्न होते की, ग्राम स्वराज्य आदर्श खेडे आणि विशेषत शेतकऱ्याप्रती आस्था हेच देशाच्या विकासाचे खरे आधारस्तंभ आहेत. परंतु आजच्या जागतिकीकरण उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या काळात जेव्हा सर्व जग जवळ आलेले असतांना आणि एकेकाळी मागास असलेल्या भारतासारख्या विविध देशांनी विकासाचा ध्यास घेतलेला असतांना मुक्त आयात निर्यात व सांस्कृतिक आदान प्रदानामुळे अर्थ व समाज व्यवस्थेमध्ये विदलता निर्माण होत आहे. तसेच गेल्या काही वर्षात संबंधीत सरकारी धोरणाच्या परिणामामुळे कृषीवर संकट निर्माण झाले आहे. अशा अनेक कारणामुळे शेतकरी हा चिंताग्रस्त होऊन शेवटी आत्महत्याकडे प्रवृत्त झाला आहे. दिवसेदिवस शेतकऱ्यांच्या आत्महत्येत वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. शेतकरी आत्महत्येचे हे लोण जिल्हा, प्रदेश आणि राज्याची सीमा ओलांडून देशपातळीवर दखल पात्र ठरले आहे. त्यामुळे शेती व्यवसायाच्या आर्थिक व धोरणात्मक बाबीवर मनन आणि चिंतन करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**संशोधनाची उद्‌दिष्टे –**

१) शेतकरी आत्महत्येमागील कारणमीमांसेचा अभ्यास करणे.

२) शेतकऱ्यांच्या आत्महत्येची पार्श्वभूमी तपासणे.

३) शेतकऱ्याच्या कृषी धोरणाचा अभ्यास करणे.

४) शेतकऱ्याच्या आत्महत्येस प्रतिबंधात्मक उपाय योजना सूचविणे.

**तथ्य सकंलन –**

तथ्य संकलित करतांना तथ्य संकलणातील फक्त दुय्यम यामग्रीचा वापर येथे करण्यात आला आहे. त्यामध्ये विविध संस्थानी सादर केलेले खाजगी व सरकारी अहवाल, संशोधन पेपर, प्रबंधिका, पुस्तके, वर्तमान पत्रातील तंत्राचे लेख आणि वेबसाईटचा वापर केला आहे.

**भारतीय पंचवार्षिक योजनेअंतर्गत केलेली कृषी गुंतवणूक –**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतीय कृषी धोरणाअंतर्गत कृषीवर मोठया प्रमाणावर गुंतवणूक होणे गरजेचे आहे. कारण २/३ लोकसंख्या ही शेतीवर अवलंबुन आहे. परंतु पंचवार्षिक योजनानिहाय कृषीवरील गुंतवणूक दिवसेदिवस कमी कमी होत असल्याचे दिसून येते, यांचाच परिणाम म्हणून कृषीक्षेत्र प्रभावित झाले आहे. त्यामुळे कृषीचा पोंशिंदा शेतकरी आत्महत्येला प्रवृत्त होत आहे. ही कृषी गुंतवणूक कशा प्रकारे झाली यांची माहिती खालील तक्त्याद्वारे दर्शविली आहे.

तक्ता क्र. १

**पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजनानिहाय कृषी क्षेत्रासाठी केल्या गेलेल्या एकूण तरतुदीचे प्रमाण**

| पंचवार्षिक योजना | कृषी संबंधित क्षेत्रासाठी एकूण तरतुदीची टक्केवारी |
|---|---|
| पहिली १९५१–५६ | १४.९ |
| दुसरी १९५६–६१ | ११.३ |
| तिसरी १९६१–६६ | १२.७ |
| वार्षिक योजना १९६६–६९ | १६.७ |
| चौथी १९६६–७४ | १४.९ |
| पाचवी १९७४–७९ | १२.३ |

| | |
|---|---|
| वार्षिक योजना १९७९–८० | १६.४ |
| सहावी १९८०–८५ | ५.८ |
| सातवी १९८५–९० | ५.९ |
| वार्षिक योजना १९९०–९१ | ५.८ |
| वार्षिक योजना १९९१–९२ | ६.० |
| आठवी १९९२–९७ | ५.२ |
| नववी १९९७–०२ | ४.९ |
| दहावी २००२–०७ | ३.९ |
| अकरावी २००७–१२ | ६.९३ |
| बारावी २०१२–१७ | ६.२९ |
| | |

स्त्रोत – बारावी पंचवार्षिक योजना अहवाल २०१२–१७

**भारतातील विविध राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या –**

भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विचार केल्यास १९९५ ते २०१६ या एकविस वर्षाच्या कालखंडात भारतात जवळपास ३३२८५८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. देशात महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश व छत्तीसगढ या राज्यात आत्महत्येचा अधिक प्रभाव दिसून येतो. भारतातील विविध राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची आकडेवारी खालीलप्रमाणे दिलेली आहे.

तक्ता क्र. २

**भारतातील आणि शेतकरी आत्महत्या प्रभावित राज्यातील आकडेवारी (१९९५–२०१६)**

| वर्ष | महाराष्ट्र | आंधप्रदेश | कर्नाटक | मध्यप्रदेश व छत्तीसगढ | पाच राज्यातील एकूण शेतकरी आत्महत्या | भारतातील एकूण शेतकरी आत्महत्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १९९५ | १०८३ | ११९६ | २४९० | १२३९ | ६००८ | १०७२० |
| १९९६ | १९८१ | १७०६ | २०११ | १८०९ | ७५०७ | १३७२९ |
| १९९७ | १९१७ | १०९७ | १८३२ | २३९० | ७२३६ | १३६२२ |
| १९९८ | २४०९ | १८१३ | १८८३ | २२७८ | ८३३३ | १६०१५ |
| १९९९ | २४२३ | १९७४ | २३७९ | २६५४ | ९४३० | १६०८२ |
| २००० | ३०२२ | १५२५ | २६३० | २६६० | ९८३७ | १६६०३ |
| २००१ | ३३१६ | १५०९ | २५०५ | २८२४ | १०३७४ | १६४१५ |
| २००२ | ३६९५ | १८९६ | २३४० | २५७८ | १०५०९ | १७९७१ |
| २००३ | ३८२६ | १८०० | २६७८ | २५११ | १०८२५ | १७१६४ |
| २००४ | ४१४७ | २६६६ | १९६३ | ३०३३ | ११८०९ | १८२४१ |
| २००५ | ३९३६ | २४९० | १८८३ | २६६० | १०९५९ | १७१३१ |
| २००६ | ४४५३ | २६०७ | १७२० | २८५८ | ११६३८ | १७०६० |
| २००७ | ४२३८ | १७९७ | २१३५ | २८५६ | ११०२६ | १६६३२ |
| २००८ | ३८०२ | २१०५ | १७३७ | ३१५२ | १०७९७ | १६१९६ |
| २००९ | २८७२ | २४१४ | २२८२ | ३१९७ | १०७६५ | १७३६८ |
| २०१० | ३१४१ | २५२५ | २५८५ | २३६३ | १०६१४ | १५९६४ |
| २०११ | ३३३७ | २२०६ | २१०० | १३२६ | ८९६९ | १४०२७ |

IMPACT FACTOR 5.473(SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal
Volume -8 : Issue-1 (February-2022)
ISSN 2455-4375

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१२ | ३७८६ | २५७२ | १८७५ | ११७२ | ९४०५ | १३७५४ |
| २०१३ | ३१४६ | २०१४ | १४०३ | १०९० | ७६५३ | ११७४४ |
| २०१४ | २५६८ | ८९८ | ३२१ | १२६९ | ५०५६ | १२३६० |
| २०१५ | ३२२८ | ९१६ | १५६९ | १३४४ | ७०५७ | १२६०२ |
| २०१६ | ३०५२ | १४०० | ८४८ | १९८२ | ७२८२ | ११४५८ |
| **एकूण** | **६९,३७८** | **४१,१२६** | **४३,१६९** | **४९,२४५** | **२,०३,०८९** | **३३२८५८** |

स्त्रोत – नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो अहवाल – २०१६

**महाराष्ट्र आणि विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या –**

सन १९९५ ते २०१६ या कालावधीच्या दरम्यान महाराष्ट्रात एकूण ६९३७८ शेतकऱ्यानी आत्महत्या केल्या, त्यापैकी एकटया विदर्भात ६५ % शेतकरी आत्महत्या झाल्याचे दिसून येते. वर्षनिहाय शेतकरी आत्महत्या वाढण्याचे प्रमाण हे वाढत असल्याचे दिसते. विशेषत: विदर्भामध्ये कापूस हेच मुख्य पिक म्हणून घेतल्या जाते. ते पिक घेणाऱ्या शेतकऱ्यामध्येच आत्महत्या करण्याचे प्रमाण जास्त असल्याचे प्रकर्षाने दिसून येते. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि विदर्भातील शेतकरी आत्महत्येचे महाराष्ट्राशी प्रतिशत खालील तक्त्याद्वारे दर्शविले आहे.

तक्ता क्र. ३

**महाराष्ट्र आणि विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची प्रवृत्ती (१९९५–२०१६)**

| वर्ष | विदर्भ | महाराष्ट्र | महाराष्ट्रातील विदर्भाचे शेतकरी आत्महत्या प्रमाण |
|---|---|---|---|
| १९९५ | – | १०८३ | – |
| १९९६ | – | १९८१ | – |
| १९९७ | – | १९१७ | – |
| १९९८ | – | २४०९ | – |
| १९९९ | – | २४२३ | – |
| २००० | – | ३०२२ | – |
| २००१ | ५२ | ३३१६ | १.५ |
| २००२ | १२० | ३६९५ | ३.२४ |
| २००३ | १६१ | ३८२६ | ४.२१ |
| २००४ | ४९८ | ४१४७ | १२.०० |
| २००५ | ४९९ | ३९३६ | १२.६७ |
| २००६ | १६५९ | ४४५३ | ३७.२६ |
| २००७ | १४४७ | ४२३८ | ३४.१४ |
| २००८ | १४८२ | ३८०२ | ३८.९८ |
| २००९ | १६०० | २८७२ | ५५.७१ |
| २०१० | १७४० | ३१४१ | ५५.४० |
| २०११ | १४९५ | ३३३७ | ४४.८० |
| २०१२ | १४६७ | ३७८६ | ३८.७५ |
| २०१३ | १२९८ | ३१४६ | ४१.२६ |
| २०१४ | १९४९ | २५६८ | ७५.९० |
| २०१५ | २०१६ | ३२२८ | ६२.४५ |
| २०१६ | १४५१ | ३०५२ | ४७.५४ |

**शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारण मीमांसा –**

शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कोणतेही एकच कारण नसते. विविध कारणांच्या समुहाचा तो परिणाम असतो. ही सर्व कारणे एकमेकात गुंतलेली असतात. विविध तज्ञानी समित्यांनी, लेखकांनी केलेल्या पाहणीवरून शेतकऱ्यांच्या आत्महत्येची विविध कारणे सांगितली आहेत ते खालील प्रमाणे दिली आहेत.

**१) जलसिंचनाचा अभाव –** १९९४ मध्ये महाराष्ट्र राज्याचा सिंचन अनुशेष (मौदिक स्वरूपात) १५३६८ कोटी रूपये असून त्यामध्ये एकटया विदर्भाचा अनुशेष ४५.३३ प्रतिशत आहे. यामुळे शेतकरी वर्षासाठी दुबार पिके घेऊ शकत नाही. त्याला पूर्णत: निसर्गावर अवलंबून राहावे लागते.

**२) शेतीच्या आदानाच्या खर्चात वाढ –** सध्याच्या काळात शेतीसाठी लागणाऱ्या आदानाच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढलेल्या दिसतात. विशेषत: हरितक्रांती नंतरच्या काळात संकरित बियाणे, रासायनिक खते, कीटनाशके यांचे उत्पादन बहुराष्ट्रीय कंपन्याच्या हातात गेल्याने त्यांच्या किंमतीत प्रचंड वाढ झालेली दिसून येते. यामुळे शेतीचा उत्पादन व्यय मोठ्या प्रमाणात वाढला.

**३) योग्य किंमतीचा (बाजार भावाचा) अभाव** – देशात विविध शेतमालाच्या शासनाकडून ज्या आधारभूत किंमती निश्चित केल्या जातात त्या ठरवितांना उत्पादन व्ययाचा विचार केल्या जात नाही तर उपभोकत्याचेच हित जास्त विचारात घेतल्या जाते. तसेच खाजगी व्यापारी वर्ग शिक्षित व संघटित असल्यामुळे त्यांच्या माल खरेदीच्या संगनमतामुळे स्पर्धा कमी होते या सर्व कारणामुळे शेतमालाच्या किंमती कमी राहतात.

**४) पुरक व्यवसायाचा अभाव –** महाराष्ट्रातील बहुसंख्य शेतकरी अल्पभुधारक आहे. त्यामुळे शेतीला पुरक व्यवसायाची जोड हवी परंतु बहुसंख्य शेतकऱ्यांजवळ शेतीला पुरक जोडधंदा नसल्यामुळे वा ते करण्यासाठी पुरेशे भांडवल नसल्याने त्यांचे उत्पन्न कमी राहुन आर्थिक विवचंनेत ते अडकले आहेत.

**५) निसर्गाचा अनियमीतपणा** – शेती व्यवसाय हा निसर्गावर अवलंबून आहे. काही भागात दोन–तीन वर्षे सतत दुष्काळ पडतो. कधी–कधी वेळेवर पाऊस सुध्दा पडत नाही, म्हणून पिकांचे नुकसान होते. म्हणजेच पाऊस अति झाला तरी नाही झाला तरी आणि अवेळी झाला तरी नुकसान शेतकऱ्यांचेच होते.

**६) जागतिकीकरणाचे धोरण** – १९९५ मध्ये भारताने डब्ल्यू. टी. ओ. चे सदस्यत्व स्विकारले त्या अनुषंगाने मुक्त आयात–निर्यात धोरणाला मान्यता दिली. त्यामुळे विदेशात स्वस्त किंमतीत तयार होणाऱ्या विविध वस्तू सोबत शेती विषयक वस्तू देखील बाजारपेठेत उपलब्ध झाल्या आहेत. विकसित देशातील शेती विषयक आधुनिक तंत्र, प्रति हेक्टरी अधिक उत्पादकता, त्यांना प्रचंड प्रमाणात मिळणारे अनुदान, यामुळे कमी उत्पादन व्ययामुळे त्यांच्या वस्तूच्या किंमती कमी असतात व दर्जा देखील चांगला असतो. त्यांच्यापुढे आपल्या देशातील शेतकरी वस्तुच्या बाबतीत जागतीक स्पर्धा करू शकत नाही त्यामुळे अतिशय कष्ट करूनही निराशाच पदरी पडते.

**७) धारणक्षेत्राचा अल्प आकार** – महाराष्ट्र राज्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांच्या जमिनीचा आकार हा अतिशय लहान आहे. त्यातही अनेक शेतकऱ्यांची जमीन सलग नसून विभाजित व अपखंडित झालेली आहे. धारण क्षेत्राचा आकार अल्प असल्यामुळे त्यामध्ये कुठल्याही आधुनिक तंत्राचा वापर करता येत नाही. महामान उत्पादनाचे कुठलेही फायदे घेता येत नाही.

**८) कर्जबाजारीपणा** – पूर्व महाराष्ट्रातील शेतकरी मुळातच अल्प उत्पन्न गटातील आहे. त्यांच्याकडे स्वत:चा निर्वाह करून शेती व्यवसायात गुंतवायला पुरेसा पैसा नाही. गरजे एवढा पैसा बॅकेकडुन मिळवायचा तर बॅकांना आवश्यक योग्य व पुरेसे तारण वा पत त्यांच्या जवळ नाही. त्यामुळे नाईलाजास्तव त्यांना सावकाराकडुन कर्ज घ्यावे लागते. सावकाराचा व्याजाचा दर अतिशय जास्त असतो. त्यामुळे सावकाराच्या पाशात शेतकरी सापडतो.

**९) अनुचित सामाजिक रूढी व परंपरा** – महाराष्ट्रातील विशेषत: विदर्भातील शेतकरी हा अतिशय अंधश्रध्दाळू व विविध सामाजिक प्रथा व परंपरा जोपासणारा आहे. जसे नवस, विवाह, तेरवी, हुंडा पध्दती या सर्व बाबीवर अनावश्यक पैसा खर्च करणे तो आपली परंपरा व प्रतिष्ठा समजतो, त्यामुळे ऐपत नसतांना कर्ज काढून तो या अनुत्पादक बाबीवर खर्च करतो.

**१०) अनियमित विज पुरवठा** – शेतीच्या अनेक समस्यांमध्ये वीज पुरवठयाची समस्या ही एक प्रमुख समस्या बनली आहे. या समस्येची व्याप्ती संपूर्ण देशभर आहे. सध्यातर या समस्येने उग्ररूप धारण केले आहे. शेतीला वीज परवडणाऱ्या, दराने नियमित आणि पुरेशा दाराने मिळावी ही शेतकऱ्यांनी रास्त अपेक्षा आहे. परंतु वस्तुस्थिती नेमकी उलट आहे.

**११) परावलंबनात वाढ** – विद्यापीठातील संशोधने आणि सरकारी प्रसार माध्यमाच्या प्रचारामुळे शेतकरी अधिक उत्पादनाचा हव्यास, व्यापारी शेती, संकरित बि–बियाणे, रासायनिक खते, व किटकनाशकांच्या पूर्णपणे आहारी गेला आणि पूर्णपणे परावलंबी झाला आहे. त्यामुळे उत्पादन खर्च वाढला.

**१२) शेतकऱ्यांची व्यसनाधीनता –** शेतीमध्ये शारिरीक कष्ट केल्यानंतर थकवा नष्ट करण्यासाठी काही शेतकरी व्यसनाधीन झाले आहे. त्यामुळे त्या व्यसनापायी शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा यावर खर्च होऊन तो कर्जबाजारी बनत चालला आहे. पर्यायाने आत्महत्येकडे प्रवृत्त झाला आहे.

**१३) संयुक्त कुटूंब पध्दतीचा ऱ्हास –** संयुक्त कुटूंब पध्दतीमुळे कुटूंबातील विविध जबाबदाऱ्या व जोखिमाचे विभाजन व्हायचे, दुर्बल वयोवृध्द व्यक्तीला एक भावनिक आधार मिळायचा परंतु आज या धकाधकीच्या जीवनात ग्रामीण भागातील सामाजिक संबंध बिघडलेले आहे.

**१४) अर्थव्यवस्थेतील द्विदलता –** एकीकडे शहरातील विविध सुख सुविधानी युक्त रंगीबेरंगी झगमगाट जीवन तर दुसरीकडे ओस पडलेली, अंधकारात, दारिद्र्यात खितपत पडलेली खेडी आहेत. म्हणजेच या औद्यागिकीकरणाचे विस्तारक परिणाम न जाणवता प्रतिसारक परिणामच मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे.

**१५) शेती विषयक राष्ट्रीय चुकीच्या धोरणाचा अभाव –** स्वांतत्र्योत्तर काळात शेती विषयक राष्ट्रीय धोरण नेहमीच धरसोडीचे राहिले आहे. १९६५ नंतर हरित क्रांतीची दिशा देशातील ग्राहकांचा विचार करून ठरविली गेली परंतु शेतीमाल पिकवून शेतकऱ्यांला काय मिळेल याचा राष्ट्रीय धोरण म्हणून विचार झाला नाही.

**१६) शेतकऱ्यांचा अज्ञानी व असंघटीतपणा –** शेतकऱ्यांचे अज्ञान व असंघटीतपणा हा देखील त्यांच्या दयनीय अवस्थेचे मुख्य कारण आहे. अज्ञानामुळे शेतकरी बाजारापेठेतील परिस्थितीचे योग्य आकलन करून घेऊ शकत नाही. त्याच बरोबर परिस्थितीचा अंदाज घेऊन कोणते पीक घ्यावे याचा निर्णय घेऊ शकत नाही. शेतकरी असंघटीतपणामुळे शेतमालाला बाजारपेठेत योग्य भाव मिळू शकत नाही. तसेच आपल्या हिताच्या विविध मागण्या तो सरकारवर दबाव आणून पूर्ण करून घेऊ शकत नाही.

**१७) शेतकऱ्यांमध्ये कृषी नियोजनाचा अभाव –** इतर व्यवसायाप्रमाणेच शेती सुध्दा एक व्यवसाय आहे आणि त्यात नफ्या तोटयाचा विचार केला पाहिजे. खर्चाचे व उत्पन्नाचे हिशेब ठेवले पाहिजे परंतु बहुसंख्य शेतकरी याची नोंदच ठेवीत नसल्याचे आढळते. यामुळे खर्च व उत्पन्नाचा ताळमेळ बसत नाही.

**१८) कृषी उत्पन्न बाजार समितीची अकार्यक्षमता –** शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समित्यांपर्यत माल न्यायला बराच खर्च येत असून तेथे देखील बऱ्याच अडचणीचा सामना करावा लागतो. त्यामुळे ग्रामीण शेतकरी गावातच खाजगी व्यापाऱ्याला माल विकतांना दिसतो. अशा प्रकारच्या अवैध खरेदीवर व शेतकऱ्यांना सहजतेने बाजार सोई उपलब्ध करून देण्यास कृषी उत्पन्न बाजार समित्या त्यांच्या अकार्यक्षमतेमुळे अपयशी ठरल्या आहेत.

**१९) प्रक्रिया उद्योगाचा अभाव –** प्रक्रिया उद्योगाचा संबंध फक्त शेतमालाच्या बाजारभावाशीच निगडित नसून परिसरातील ग्रामीण बेकारी दूर करण्याशी आहे. विशेषत: विदर्भातील कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग स्थापन झाले नाही. त्यामुळे कच्चा माल विदर्भातून निर्यात केल्या जातो व पक्क्या मालाची आयात केली जाते त्यामुळे विदर्भात बेरोजगारीचे प्रमाण वाढतच आहे.

**उपाययोजना –**

महाराष्ट्र राज्यातीलच नव्हेतर संपूर्ण देशातील शेतकऱ्यांच्या समस्याचे स्वरूप हे अतिशय व्यापक आहे. त्यांची मूळ ही या समाज व अर्थव्यवस्थेत अतिशय खोलवर रूतलेली आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे सर्वकष पणे सर्व बाजूंनी विचार करणाऱ्या दृष्टिकोनाची आवश्यकता आहे. म्हणूनच शेतकऱ्यांच्या आत्महत्या या आपत्तीचे व्यवस्थापन करण्यासाठी तात्कालिक व दीर्घकालीन या दोन दृष्टीनी उपाययोजना विचारात घेतल्या आहेत.

**तात्कालिक उपाययोजना –**

१) आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटूंबीयांना त्वरीत आर्थिक व भावनिक आधार द्यायला हवा

२) आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना जाणाऱ्या शासकीय मदतीचे निकष बदलावेत.

३) समस्याग्रस्त शेतकऱ्यांना संपूर्ण कर्ज माफी देण्यात यावी.

४) शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारीत भाव देण्यात यावे.

५) सरकारद्वारे बी–बियाण्यांचे मोफत वाटप करण्यात यावे.

६) शासनाने कडक कायदे करून सावकारी कर्जाचे नियमन करावे.

७) शेतकऱ्यांना संस्थागत स्त्रोताद्वारे सुलभतेने कर्जपुरवठा करण्यात यावा.

**दुरगामी उपाय –**

१) जलसिंचन अनुशेषाची पूर्ती करण्यात यावी.

२) पाणलोट क्षेत्राचा विकास मोठ्या प्रमाणावर करण्यात यावा.

३) शेतीपुरवठा व्यवसाय/जोडधंद्याची निर्मिती करण्यास सहाय्य करण्यात यावे.
४) शेतीमाल प्रक्रिया उद्योगांची निर्मिती व विकेंद्रीकरण करण्यात यावे.
५) पिक पध्दतीत बदल/पिकांचा फेरपालट बद्दलचे योग्य मार्गदर्शन शेतकऱ्यांना करण्यात यावे.
६) प्रत्येक खेडयात गोदामाची व्यवस्था करावीत.
७) माती परिक्षणाची सोय उपलब्ध करून द्यावी.
८) रासायनिक खताऐवजी सेंद्रीय शेतीवर भर देण्यात यावा.
९) शेतकऱ्यांना भू—जल तज्ञांचे विनामूल्य मार्गदर्शन देण्यात यावे.
१०) शेतकऱ्यांना नियमित व सवलतीच्या दरात वीजपुरवठा करण्यात यावा.
११) पूर नियंत्रणासाठी लहान व मध्यम जलसिंचन प्रकल्प उभे करावेत.
१२) शेतकऱ्यांसाठी पीक विमा योजना सुरळीतपणे सुरू करण्यात याव्यात.
१३) शेतीमालाच्या बाबतीत किंमत स्थिरता असावी.
१४) विदेशातुन होणाऱ्या शेतमाल वस्तुवरील आयात शुल्कात वाढ व्हावी.
१५) शेतकऱ्यांनी शेतकरी चर्चा मंडळे स्थापन करून मजबूत संघटन उभारावे.

**समारोप :—**

अलीकडच्या काळात शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा दूरगामी आर्थिक परिणाम करणारा ज्वलंत आणि गंभीर प्रश्न बनला आहे. अन्नदात्यावर २१ व्या शतकामध्ये आत्महत्येची वेळ आल्याने शासन व्यवस्था व समाजासाठी ती चिंतनाचा व संशोधनाचा विषय बनला आहे. व्याजदर अधिक, जलसिंचनाच्या अपुऱ्या सोयी, कर्जाचा वाढता डोंगर, उणिव असलेली विमा योजना ही शेतकऱ्यांच्या आत्महत्यामागची प्रमुख कारणे आहेत असे कृषी आयोगाचे अध्यक्ष डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांनी व्यक्त केले आहेत. नव्या आर्थिक धोरणात पतपुरवठा धोरणात झालेली घट, कृषी कार्यव्यवस्थेचे बदलते स्वरूप, कृषी मालाचा वाढता उत्पादन खर्च, अशा अनेक कारणांमुळे शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आली आहे, हे रोखण्यासाठी शासनस्तरावर अनेक उपाय योजले आहेत. उदा. ग्रामीण रोजगार कार्यक्रम, अवर्षण प्रवण क्षेत्रविकास कार्यक्रम, विशेष कृषी क्षेत्र कार्यक्रम, कर्जमाफी, शेतीपूरक प्रक्रियांचा उपयोग इ. कार्यक्रम परिणामकारकरित्या व किती प्रभावीपणे राबविले जातात हा एक प्रश्न आहे. थोडक्यात शेतकऱ्यांमध्ये चालू असलेले आत्महत्येचे सत्र थांबविण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविणे गरजेचे आहे. शेतीवर आधारित उद्योग व्यवस्थापनात वाढ करून, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी त्यांचे मनोधैर्य उंचावण्यासाठी प्रयत्नाची पराकाष्टा करणे आवश्यक आहे.

**संदर्भ —**


- कदम धीरज (२००७). यवतमाळ जिल्हयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या, स्वरूप व कारणमीमांसा, (एफ फिल प्रबंधिका) अमरावती विद्यापीठ, अमरावती.
- जहागिरदार दि. व्य. (२०१२) महाराष्ट्र: ५० वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा सेंटर फार एकॉनॉमिक ॲण्ड सोशल स्टडीज, अमरावती.
- स्मरणिका: विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत राज्यस्तरीय परिसंवाद, नेहरू महाविद्यालय नेर परसोपंत जि. यवतमाळ दि. २९ व ३० जाने २००७.
- खुपसे मार्तड (२००९) शेतकऱ्यांच्या आत्महत्या चिंता आणि चिंतन, समीर प्रकाशन, कळंब जि. यवतमाळ.
- Mishra Shrijit (26 Jan, 2008) suicide of Farmers in Maharashtra (submitted to the Govt. of Maharashtra) IGIDR, Mumbai.
- Causes of Farmer suicides in Maharashtra: An Enquiry Final Report submitted to the Mumbai High Court, 15 March, 2005 (TISS)
- Economic Survey of Maharashtra 2010-2011 (Govt. of Maharashtra)
- Website-Google-Farmer suicides- The Hindu- P. Sainath.
- Conference proceedings, Agriculture police in India farmers suicide, Samarth Mahavidyalaya, Lakhani.
- National crime record bureau: Publication year 2016.